# खरे प्रेम

खरे प्रेम तर निःस्वार्थ असते. ते शुध्द असते. ते आत्म्याच्या गुणांशी असते. प्रेम तो महान गुण आहे जो आपण भगवंताशी करतो आणि भगवंत आपण आत्म्यांशी करतात. परमात्म्याचे आपण आत्म्यांवर खूप प्रेम आहे. म्हणून त्यास दयाळू, कृपाळू आणि हरमदिल म्हटले जाते. तो तर प्रेमाचा सागर आहे परंतु आपण त्यांच्याकडून किती प्रेम अनुभव करतो हे आपल्या क्षमतेवर अवलंबुन आहे. सागरात तर अथांग पाणी आहे परंतु आमच्याकडे छोटासा लोटा किंवा ग्लास असेल किंवा घोटभरच पाणी घेतले तर ही आपल्यातीलच कमी म्हटली जाईल, सागर तर सदा दाता आहे. अशाच प्रकारे परमात्मा प्रेमाचा सागर आहे, जो सतत आम्हा आत्म्यांवर प्रेमाची वर्षा करतात. परंतु आम्हाला प्रेम घेणे शिकायला हवे.

प्रेम घेण्याची पध्दत आहे प्रेम देणे. परमात्म्याच्या प्रेमाचे पात्र बनण्यासाठी त्यांच्याशी प्रीत करायला हवी. प्रेम दिल्याने प्रेम मिळते. परमात्म्याशी प्रेम करण्याचा अर्थ आहे त्यांच्या समान बनणे. परमात्म्याचे प्रेम आपण तेंव्हा प्राप्त करु शकाल जेव्हा आपण त्यांच्या समान बनाल. परमात्मा शाक्तिचा सागर , सुखाचा सागर आहे. आपण आत्म्ये जेवढे-जेवढे या गुणांचा आपल्या आत अनुभव करीत जाऊ तेवढे-तेवढे परमात्म्याच्या प्रेमाची अनुभूति करु शकाल. तसे तर परमात्मा सर्वांवर सारखेच प्रेम करतात परंतु आपण आत्म्ये आपल्या-आपल्या क्षमते अनुसारच त्यांच्याकडून प्रेमाचा अनुभव करतो. सुर्य सर्वांना समान प्रकाश देतो परंतु घरात प्रकाश येण्यासाठी खिडकी उघडी ठेवायला हवी. म्हणूनच म्हटले जाते अंतर मनाचे डोळे उघड. जेव्हा आपण आतील नेत्र उघडू तेव्हा आत्मा आणि परमात्मा यांचा अनुभव करु अर्थात त्या प्रेमाच्या सागरात स्वतःला समावताल.

रचयित्या वर प्रेम अर्थात संपूर्ण रचनेवर प्रेम होऊन जाते. असे नाही कि एका-एकाशी स्नेह ठेवला तर ईश्वराशी प्रेम होईल. बीजाला पाणी दिल्याने पानांना पाणी आपोआपच पोहोचते. एक परमात्म्याशी ह्दयापासून खरे प्रेम ठेवा तर सर्व आत्म्ये भाऊ-भाऊ एक परमात्म्याची मुले अनुभव होतील. तेव्हाच प्रकृतिशी सुध्दा प्रीत होईल आणि ती आमची सेवक बनेल. आज मान खरा स्नेह विसरुन हिंसेला आपला आधार बनवित आहे. त्याला वाटते कि बाहुबळाने किंवा हिंसेच्या बळावर कोणालाही जिंकता येते, परंतु बाहूबळाने आपण कोणाचे दोन पैसे हिसकावून घेऊ शकतो, कोणाची जमीन ताब्यात घेऊ शकतो परंतु त्याचे ह्दय जिंकु शकत नाही. अहिंसेचा अर्थ आहे -दुःख देऊ नका, दुःख घेऊ नका, जगा आणि जगू द्या. अहिंसा आणि प्रेमाचा आपसात गहन संबंध आहे. मनुष्य तर ग्य पण पशू, पक्षी, प्राणी, प्रकृतिलाही दुःख देऊ नये. जड व चैतन्य, सर्वांशी प्रेम असावे. हीच आहे स्नेहाची शक्ति.

सर्वांचे कल्याण करायचे आहे ः जेंव्हा सर्वांचे कल्याण करण्याची भावना जागृत होईल तेंव्हा सर्वांसाठी स्नेह आणखी वाढत जाईल. मला कोणाचेही अकल्याण करायचे नाहीए, केवळ एवढेच पर्याप्त नाही. परंतु हा विचार तीव्र व्हायला हवा किंवा होत जावा कि मला जड-चेतन सर्वांचे कल्याण करायचे आहे. कल्याण करण्याचा सर्वश्रेष्ठ मार्ग आहे शुभ-भावना ठेवणे आणि शुभ कामणा करणे. प्रकृतिचे कल्याण करण्यासाठी वातावरणात शुध्द संकल्पांचे प्रकम्पन पसरवायला हवे. प्रकृतित प्रदुषण थांबविण्याचे पाऊल तर उचलले जाते परंतु हे पर्याप्त नाही. ध्वनि प्रदुषण थांबविण्यासाठी सायलेन्स झोन बनविले जातात परंतु शांत मनाने शुध्द संकल्प पसरविण्याचे कार्य कोणी विरलाच करतो. सर्वांचे कल्याण करण्याची भावना आज खूपच कमी झाली आहे. ही भावना तेंव्हा जागृत होईल जेव्हा सर्वांसाठी स्नेह असेल. दुःख देण्याऱ्याला ही स्नेह द्यायचा आहे. जर दुःख देणारा आपले कार्या सोडत नाही तर मी आपले सूख देण्याचे कर्तव्य का सोडायचे. यावरुन एक गोष्ट आठवते. कोण्या नदीच्या किनारी एक साधू बसला होता आणि तो बघत होता कि एक विंचू नदीत वून चालला आहे. विंचवाला वाचविण्यासाठी साधूने त्याला पकडले, हातात विंचू येताच त्याने हातावर डंक मारला आणि तो साधूच्या हातातून सुटला. एक व्यक्ति जो हे दृश्य बघत होता, त्याने साधूला म्हटले कि विंचु डंक मारीत आहे तरी सुध्दा आपण त्याला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहात. तेव्हा साधूने म्हटले कि विंचू आपले कर्तव्य सोडीत नाही तर मी का सोडू. त्याचे कर्तव्य आहे डंक मारणे आणि माझे कर्तव्य आहे कोणाला वाचविणे.

- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स
www.bkvarta.com